दैनिक सागर रायगड
Raigad
E-mail: dailysagar@gmail.com website- www.dainiksagar.com
रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबईसह पाच स्वतंत्र आवृत्त्या
वर्ष ४९ अंक ९ RNI Regi. No. MAHMAR/2008/24817 शुक्रवार दिनांक २८-६-२०१३

# महाडचे डॉ. रुमाणे अमेरिकेत हिरो



बुरुड यांच्याच घरी भेटले महाडमधील या गावचे डॉ. अब्दुल रझाक रुमाणे. डॉ. रुमाणे हे कुवेतमध्ये प्राध्यापक आहेत. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स या भारतातील संघटनेचे ते अध्यक्ष आहेत. त्यांनी क्वालिटी मॅनेजमेंट इन कन्स्ट्रक्शन प्रोजेक्टस्, क्वालिटी टूल्स फॉर मॅनेजिंग कन्स्ट्रक्शन प्रोजेक्टस् असे इंजिनियरिंगच्या शास्त्रातील मानदंड मानलेले ग्रंथ लिहिले आहेत. अमेरिकेतील टेलर अँड फ्रान्सिस ग्रुप या समूहाने हे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. डॉ. रुमाणे यांनी हे ग्रंथ आपल्या आईवडिलांना अर्पण केले आहेत. आता याच अमेरिकेतील प्रशासन संस्थेला कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंटवर आणखी एक ग्रंथ तयार करावयाचा आहे असे ग्रंथ लिहिणारा आपणासारखा लेखक नाही म्हणून तुम्हीच ही जबाबदारी घ्यावी असे अमेरिकन प्रकाशकाने लिहिलेले पत्र त्यांनी माझ्या हातात ठेवले आणि मी डॉ. रुमाणेंना कडकडून मिठी मारली. कोकणातील बुद्धिमत्ता किती पराकोटीची आहे हे अत्यंत नम्र